
गमती देशोदेशींच्या-३
फिनलंड जपान सिंगापूर
अनामिका बोरकर
TAIPEI
ROMA
NEW YORK

**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# गमती देशोदेशीच्या -3

# फ़िनलंड, जपान, सिंगापूर

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख. आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो. मजा येते.

पण तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या. लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या. मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# गमती देशोदेशींच्या -३

## फ़िनलंड, जपान, सिंगापूर

लेखिका

**अनामिका धनंजय बोरकर**

# गमती देशोदेशींच्या -३

# फ़िनलंड, जपान, सिंगापूर

## लेखिका... अनामिका धनंजय बोरकर

अ / १८,वूडलॅंड अपार्टमेंट, गांधी भवन मार्ग,कोथरुड,पुणे ४११०२९.
दूरध्वनी:९८१९८६९०९०.
ई-मेल: bodhamu@gmail.com
Most of the photoes are by author but a few photoes are taken from Google (noncommercial licence).

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604
**प्रकाशन : १० जानेवारी २०२१**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## अनामिका धनंजय बोरकर



* सिंगापूरमध्ये असताना महाराष्ट्र मंडळाच्या अनेक उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याची संधी मिळाली. महाराष्ट्र दिनानिमित्त सादर केलेल्या महाराष्ट्राच्या स्टॉलचे आयोजन करताना खूप मोठमोठ्या भारतीय मान्यवरांची जवळून भेट घेता आली. सिंगापूर सरकारने आयोजित केलेल्या भारताच्या संस्कृतिक प्रदर्शनात महाराष्ट्राचे दिमाखदार पॅवेलियन, महाराष्ट्रातील वस्तूंची सिंगापूर मध्ये विक्री, सिंगापूरमधील मान्यवरांच्या त्यामुळे झालेल्या ओळखी अविस्मरणीयच! महाराष्ट्र व भारतासंबंधी वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी पुढाकार घेणे, त्यासाठी येणाऱ्या पाहुण्यांची यथोचित सरबराई करणे हाही एक छंदच.

* कॉलेज जीवना पासूनच नाटकाबद्द्ल खूप प्रेम. नाटकाच्या संदर्भात दिग्दर्शन करणे, नेपथ्य करणे याची जास्त आवड. महाराष्ट्र मंडळाच्या नाटकांबरोबरच भारतातून तिथे सादर होणा-या नाटकांसाठी नेपेथ्य करताना खूप शिकता आले. खूपशा प्रथितयश नट नट्यांना जवळून बघता आले आणि ब-याच ठिकाणी त्यांना वाटाड्या म्हणून सिंगापूर दर्शनही घडवण्याचा योग आला.

* वाचन मनापासून आवडते. पण कोणीही विषय विशिष्ट असे नाहीत. लेखक तर सगळेच प्रिय. कारण प्रत्येकामध्ये काहीतरी लिखाणाचे वेगळे कौशल्य लपलेले असते. त्यामुळे वेगवेगळ्या लेखकांची विविध विषयांवरची पुस्तके वाचणे ह्यातली गंमत काही वेगळीच. मला ती आवडते. तरीही त्यातल्या त्यात पुल आणि मंगला गोडबोले आवडते लेखक. ऐतिहासिक पुस्तके हा वीक पॉईंट म्हणता येईल .

**नमस्कार.**

आपण एव्हाना माझ्या ' गमती देशोदेशींच्या ' या पुस्तकाचे दोनही भाग वाचले असतीलच. *(Links on last page)* पहिल्या भागात तुम्ही अमेझोनच्या खोऱ्यातील तांबोपाटामध्ये वास्तव्य केलेत, आफ्रिकेमधील जंगल सफारी अनुभवलीत, प्राणी पक्षी बघितले, न्यूझीलंडच्या वायटामो गुहेतील काजव्यांची गंमत बघितली. दुसऱ्या भागात तुम्ही उरोस इथल्या टीटीकाका या तळयात तरंगत्या खेड्यातली गंमत अनुभवलीत, दुबईतल्या वाळवंटामधील फुललेल्या बागा बघितल्यात, तिथल्या फुलपाखरांना हाताळलेत, तिबेटच्या सर्वात उंचावरून जाणाऱ्या रेल्वेचा थरार अनुभवलात, बर्फाचे डोंगर पाहिलेत. तुम्ही या दोन भागातील लेख वाचताना त्या त्या ठिकाणी मनाने नक्कीच सफर करून आला असाल.

चला तर मग ! आपण आता अशा आणखी काही ठिकाणी जाऊन येऊ. म्हणजे ' गमती देशोदेशींच्या ' या पुस्तकाचा तिसरा भाग वाचू या. या भागात काय आहे सांगू? दर डिसेंबर

महिन्यात जगभर लहान मुलांना खेळणी खाऊ वाटणारा सांता क्लॉज आपल्याला भेटणार आहे, जपानचा सुप्रसिद्ध चेरी ब्लॉसम जवळून पाहणार आहोत, तिथल्या बागांची वैशिष्ट्ये बघणार आहोत आणि सिंगापूर मधील नवीन वर्षाच्या काही चालीरीती वाचणार आहोत.

जशी पहिली दोन पुस्तके आपल्याला आवडली तसेच या पुढचे भागही आपल्याला आवडतील याची मला खात्री आहे. ई साहित्यने आम्हाला लेखन करायला व आपल्याला वाचन करायला जी संधी उपलब्ध करून दिलीय त्यामुळे आपल्यापर्यंत पोहोचणे मला शक्य झाले आहे. ई साहित्यने उपलब्ध करून दिलेल्या या संधीचा आपण सगळे जास्तीत जास्त फायदा करून वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याचा आनंद अनुभवूया.....

अनामिका बोरकर (९८१९८६९०९०)

# अनुक्रम

फ़िनलंड : एक आनंददायी भेट- सांताच्या गावी!

जपान: ले गया दिल, साकुरा जपानका...

सिंगापूर: सिंगापूरचे “गॉंग सी फा चाय”

# एक आनंददायी भेट- सांताच्या गावी!

“आज्जी, मला झोप येत नाहिये. गाणं म्हण ना! ”

“नाही नाही... गाणं नको! तू आपली गोष्टच सांग मला! ”

शाल्वलीचे एका मागोमाग पर्याय सांगणे चालूच होते! तिचा रात्री ११ वाजता सुद्धा ताजातवाना असलेला आवाज एरवी कितीही छान वाटत असला तरी.. आत्ता तिला झोपवण्यासाठी काहीतरी करणे मला भागच होते. भसाड्य़ा आवाजामुळे नातीला अंगाईगीत म्हणून झोपवणे तर मला शक्य नव्हते पण गोष्टी सांगणे सहज शक्य होते. डिसेंबरचा महिना असल्याने सांताक्लॉजच्या गोष्टी मला बरेच दिवस पुरत. त्यातलीच एक मी शाल्वलीला –माझ्या नातीला – सांगत होते. ती पेंगुळलीय असे मला वाटले म्हणून मी गोष्ट संपवण्याच्या मार्गावर आणणार तोच “आजी, सांग ना, तू खरंच सांताक्लॉजला भेटली आहेस? ” या शाल्वलीच्या प्रश्नामुळे मी एकदम फिनलंडमध्ये पोहोचले.

लहानपणापासून सांताक्लॉजच्या गोष्टी ऐकल्या होत्या, पण सांगलीसारख्या गावात आमच्या अवतीभवती त्याचा वावर फारसा नव्हता. आम्ही लहान असताना शाळेला ख्रिसमसच्या सुट्ट्याही नसायच्या. त्यामुळे सांताक्लॉज, त्याच्या गोष्टी या शाळेतल्या वाचनालयातून मिळणाऱ्या पुस्तकातूनच वाचलेल्या. मुंबईत त्याची दूरून ओळख झाली खरी पण सिंगापूरला गेल्यावर तिथल्या संस्कृतीमुळे तो एकदम जवळ आला. “एका रात्रीत जगभर खेळणी वाटत फिरणारा सांताआजोबा” म्हणून त्याची नव्याने ओळख झाली. यातील खरेपणा वा कुतुहल वाटण्याचं वय राहिलं नसलं तरी दरवर्षी ख्रिसमसच्या गाजावाजामुळे मनात कुठेतरी या व्यक्तिमत्वाबद्दलचं कुतुहल घर करून होतं. आमच्या ’दरवर्षी एक परदेश’ या कार्यक्रमात एका वर्षी स्कॅंडेनेव्हियाची सफर आली अन अचानक ’सांताच्या’ गावाला जाण्याची संधी समोर आली.

सिंगापूरहून जर्मनी मार्गे फिंनलंडची राजधानी हेलसिंकी, व तिथून विमान बदलून रोवानिएमी या गावी आम्ही पोहोचलो. तिथून आमची टूर सुरू होणार होती. आमचे सगळे सहप्रवासीही जगभरातून कुठून कुठून येऊन आम्हाला तिथेच भेटणार होते.

हेलसिंकीहून रोवानिएमीला जाण्यासाठी आम्ही फिन एअरचे विमान पकडले. विमान वर चढताच खाली धरित्रीने अलगद ढगांची चादर पांघरून घेतली. तरीपण खोडकर मुलाप्रमाणे अनेक छोटी मोठी गावं ढगांच्या चादरीच्या छोट्या छोट्या भोकातून आम्हाला दर्शन देत होती. या प्रवासात ढगांच्या विविध रंगछटा पहायला मिळाल्या आणि विविध आकार सुध्दा. सकाळची वेळ होती॰ आमचे छोटेसे विमान वाऱ्याच्या झोतावर थोडेथोडेसे हेलकावे खात होते. नुकताच नाश्ता झाला होता आणि रात्रभराच्या प्रवासाचा थकवा होता. त्यामुळे नाही म्हटले तरी डोळयांवर मधून मधून निद्रादेवी आपली मायेची पाखर घालत होती. मीही याला अपवाद नव्हतेच. डोळे मिटून घेण्याअगोदर ढगांना 'गुड नाईट' करण्यासाठी खिडकीकडे नजर टाकली. तर खिडकीतून खाली एक अगदी अनोखे दृश्य अनपेक्षितपणे दिसले. स्वच्छ पांढऱ्या ढगांवर संपूर्ण गोलाकार इंद्रधनुष्य!! त्याचे सातही रंग अतिशय सुस्पष्ट दिसत होते. अगदी करकटक ठेऊन काढावा तसा इंद्रधनुष्याचा आखीव रेखीव गोल नजर खिळवून ठेवत होता. बराच वेळ ते इंद्रधनुष्य आमच्या बरोबर पुढेपुढे जात होते. कधीकधी ढगांच्या छोट्या भोकातून खालची गावेही त्या गोलात येत होती. विमानाशेजारून खाली ढगांवरून विमानाची छोटीशी सावलीही चालली होती. विमानाच्या गतीशी जुळवून घेताना कधी ती खालच्या ढगांवर

स्वार होत होती तर कधी ठेचकाळून उडी मारत होती. बराच वेळ अशी विमानाबरोबर पळापळ केल्यावर सावली दमली. इकडे इंद्रधंनुष्याचाही विमानाजवळ येण्याचा वेग वाढला व ते इतके जवळ आले की बघता बघता विमानाची छोटीशी सावली इंद्रधंनुष्याच्या गोलाच्या मधोमध दिसू लागली. थोडा वेळ ही गंमत दिसली. सावली व इंद्रधनुष्याचा खेळ बघता बघता वेळ कसा गेला कळलेच नाही. रोवानिएमी जवळ आले तशी विमानाचीही उतरण्याची तयारी सुरू झाली. जसे विमान ढगांच्याजवळ यायला लागले तशी सावली मोठी मोठी व्हायला लागली आणि इंद्रधनुष्यात मावेनाशी झाली. सावलीला सामावून घेण्यासाठी तेही मोठेमोठे होत गेले, त्याचे रंग फिकूटायला लागले. पहातापहाता विमान ढगांचा पडदा फाडून रोवानिएमीकडे झेपावले आणि आम्ही भानावर आलो. नंतरही कितीतरी वेळ ते गोलाकार इंद्रधनुष्य डोळयासमोरून हालत नव्हते.

रोवानीएमी हे अगदी छोटेसे पण टुमदार गाव. पर्यटन हाच मुख्य व्यवसाय. पण ‘आर्क्टिकसर्कल’वरचे पहिलेच गाव म्हणून महत्वाचे. वर्षातले काही दिवसतरी २४ तास सूर्य बघणारे गाव. हातातले घड्याळ रात्रीचे ९ वाजल्याचे

सांगत होते म्हणून रात्र झालीय असे समजायचे. पण संध्याकाळच्या ५ - ६ वाजता असतो तेवढा लख्ख उजेड. उद्या आम्ही इथे आमची पहीलीच सामी व्हीलेजची टूर करणार होतो. गाव पहाण्याची उत्सुकता होती पण थकलेले शरीर आम्हाला हॉटेलवर घेऊन गेलेच. “सूर्याच्या उजेडात कशीकाय झोप लागेल कोणजाणे” असे म्हणत सगळे अंथरूणावर पडताच ढाराढूर झोपलो. सकाळी तिथल्या किमी नदीच्या काठी जायला निघालो ते सामी व्हिलेजला जाण्यासाठी. आमचा वाटाड्या रोवानिएमीची माहिती सांगत होता, महत्वाची ठिकाणे दाखवत होता. ‘किमी’ नावाची निळ्याशार पाण्याची नदी स्वच्छ सूर्यप्रकाशात न्हाऊन निघाली होती. आमची नाव काठावर आमची वाट पहात होती. स्वच्छ स्फटिकासारखे पाणी आमची नाव पुढे ढकलत मागे मागे जात होते. त्याच्या फेसात हात बुडवण्याचा मोह आवारत नव्हता. पण “जर ते पाणी तोंडात गेले तर पुढचा सगळा मुक्काम इस्पितळात नक्की इतके ते नवीन माणसाला पचायला जड आहे” हे वाटाड्याकडून ऐकल्यावर हात आपोआपच खिशात गेले. फक्त आसपासचा भाग पहात व या नदीचे पाणी केसांच्या वाढीसाठी किती उत्तम आहे हे ऐकत, बाजूचे निसर्ग सौंदर्य पहात एका तासाने सामीव्हिलेजच्याजवळ आम्ही पोहोचलो. तिथे उतरलो तर आश्चर्यचकीतच झालो कारण गावात जाणारी लाकडी अरुंद पायवाट सोडली तर

आजुबाजूला काहीच दिसलं नाही. दूरपर्यंत फक्त गवतच गवत दिसत होतं. नावेचा मुक्काम चुकला की काय असे वाटतेय तोच एक सामी माणूस त्या पायवाटेवरून पुढे आला.

आमचे स्वागत करून त्याच्या आगामी भाषेत बडबड करत त्याने आमची वरात त्या शेतातून जाणाऱ्या एक फूट उंचीच्या वाटेवरून चालवली. तो अखंड बडबडत होता पण एक शब्द कळेल तर शपथ. आम्हाला कुठे नेत होता तोच जाणे. याच भाषेत जर सामी लोकांच्याविषयी माहिती मिळणार असेल तर उगीचच वेळ फुकट घालवायचा का असाही विचार मनात डोकावला. फक्त इथे सामी व्हिलेजला भेट दिल्याचे व आर्क्टिकरेषा ओलांडल्याचे सर्टिफिकेट मिळणार होते हाच काय तो फायद्याचा मुद्दा आम्हाला पुढे नेत होता. आमची वरात त्या पायवाटेच्या दुसऱ्या टोकाला पोहोचली तर तिथे एकदम वेगळेच दृश्य बघायला मिळाले. एक गोलाकार भल्यामोठ्या घरासारखी झोपडी, तिच्याभोवती आणखी तीन चार छोट्याछोट्या झोपड्या, आर्क्टिकरेषा काढलेला बोर्ड आणि रेनडियरच्या पाठीवर हात ठेऊन उभ्या असणाऱ्या दोन अप्सरेसारख्या सुंदर मुली. त्यांची वेषभूषाही सामी पध्दतीची होती ते पाहून तर आता आगम्य भाषेतलाच सगळा व्यवहार असणार याची खात्रीच झाली. माहिती कळाली नाही तर न कळू दे पण निदान रेनडियरचे

फोटो तरी काढू म्हणून आम्ही पुढे सरकणार तोच स्वच्छ स्पष्ट इंग्रजीत त्या दोघींच्याकडून आमचे स्वागत झाले व आम्हाला सुखद धक्का बसला. मग तो आम्हाला न्यायला आलेला माणूसही हसतहसत पुढे आला. त्याने आम्हाला मोठ्या झोपडीत नेऊन शुद्ध इंग्रजीत सामी लोकांच्या जीवनपध्दतीची माहिती देणे, त्यांच्या टोप्या घालून आमचे फोटो काढणे, रेनडियरबरोबर फोटो, त्या सुंदर मुलींबरोबर फोटो वगेरे सर्व उपचार यथासांग पार पाडले. शेवटी आम्हाला सर्टिफिकेट देऊन आमची रवानगी केली. (फक्त रेनडियरचे दूध आमच्यापैकी फक्त पुरूषांनाच प्यायला मिळाले हा अन्याय बराच वेळ मनात डाचत होता) .

Singapore Tourists at Sami villege



27

फिनलंडमधील रोवानिएमी या आर्क्टिकसर्कलवरील गावापासून ८ कि. मी. वर सांताव्हिलेज आहे. विषुववृत्ताच्या उत्तरेला ६६°३२´३९˝ अक्षांशावर आर्क्टिक ही काल्पनिक रेषा आजपर्यंत फक्त नकाशावर पाहिली होती, (परीक्षेत मिळणारा एक मार्क इतकेच त्याचे तेंव्हा महत्व). ती प्रत्यक्षात पायाखाली आल्यावर थ्रिल तर वाटलंच पण लहानपणच्या अनेक कल्पना किती हास्यास्पद होत्या त्याचीही गंमत वाटून गेली. रोवानिएमीला मुक्काम व रात्रभर (न मावळलेल्या) सूर्याचे निरीक्षण करून आम्ही पुढे निघालो. बसचा प्रवास मला मनापासून आवडतो. खिडकीबाहेरची धावती दुनिया आपल्याला खूप काही वैविध्य दाखवत असते. एखाद्या सुस्तावलेल्या अजगराप्रमाणे काळाभोर रस्ता दूरपर्यंत दिसत होता. दोन्ही बाजूंनी सुरू, देवदाराचे वृक्ष होते. रस्त्याच्या अगदी कडेला छोटी छोटी झुडुपे आपली वेषभूषा फुलांच्या पाकळ्या उलगडून पूर्ण करत होती. चढउतार भरपूर होते. ठिकठिकाणी “रस्त्यावर रेनडियर फिरत असतील, चालकांनी योग्य काळजी घ्यावी” अशा त-हेच्या पाट्या होत्या.

त्या पाट्यांची मला खूपच गंमत वाटली. रेनडियर असे रस्त्याच्या अधेमधे कशाला येतील (मरायला) असा विचार मनात येत होता तोच बस कचकन ब्रेक दाबून थांबली.



दचकून समोर बघतो तो काय! शे दीडशे रेनडियर ‘रास्ता रोको’ च्या पवित्र्यात उभे! झालं! बसचा मुक्काम तिथेच! ड्रायव्हरसाहेब हॉर्नसुध्दा न वाजवता बस बंद करून स्वस्थ बसलेले पाहिले आणि आम्ही त्यांच्या परवानगीने खाली उतरलो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना, समोर रस्त्यावर सगळीकडे रेनडियरच रेनडियर.

एक दीड तास त्यांना भेटून व भरपूर फोटो काढून त्यांची समजूत काढली तेंव्हा कुठे पुढे जाण्याची परवानगी मिळाली. अन खरोखरच रस्ते मोकळे व गुळगुळीत असूनही वाहने काळजीपूर्वक व सावकाश का चालवली जात होती याचे रहस्य कळाले.

स्वच्छ सूर्यप्रकाश व सकाळची वेळ असूनही सर्व वाहनांचे दिवे चालू होते. (तसा नियमच आहे म्हणे) . 'रेनडियर त्यांना हवे तसे वागतील, रस्ता व सगळापरीसर त्याच्यासाठी आधी व मग इतरांसाठी' हा नियम इथे काटेकोरपणे पाळला जातो. नशीब त्या वेळी आम्ही बोगद्यात नव्हतो. नाहीतर बसमध्येच बसून राहावे लागले असते. हे सगळं पहाताना ८ कि. मी. चा रस्ता भुर्रकन मागे पडला.

अचानक समोर "सांता व्हिलेज" ही पाटी दिसली आणि सर्व प्रवाशांमधे एकदम चैतन्य संचारले. सांताक्लॉज ही व्यक्ति जगभरात सर्वांनाच परिचित आहे. त्याच्याबद्दलच्या खऱ्या खोट्या बऱ्याच गोष्टी लहानपणापासून ऐकून त्याच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाबद्दल, कर्तृत्वाबद्दल खूपच कुतूहल सर्वांना वाटते. अशी जगप्रसिद्ध 'सेलेब्रिटी' सहजासहजी भेटेल किंवा बघायला मिळेल यावर विश्वास बसणं थोडं कठीणच! (विशेषतः भारतातल्या मोठ्या माणसांच्या भेटीतले अडथळे आठवल्यावर) .



Enter Santa's abode




'सांता व्हिलेज' या छोटेखानी (कमर्शियल) खेड्यातली महत्त्वाची ठिकाणे म्हणजे सांताचे ऑफिस, पोस्ट ऑफिस, रेनडियरची बाग, बर्फावरचे खेळ आणि अर्थातच गिफ्ट शॉप. हो! मुख्य म्हणजे आर्क्टिक सर्कलची रेषा व त्या ठिकाणाहून महत्त्वाचे छोटे मोठे देश कुठल्या दिशेला किती अंतरावर आहेत ते दाखवणाऱ्या पाट्यांना सांभाळणारे खांब.


TAIPEI
ROMA
NEW YORK
ARCTIC

समोरची कमान ओलांडून पुढे गेलो तो जिंगल बेलचे सुमधुर, मन उल्हसित करणारे सूर ऐकू येऊ लागले. साथीला मंद आवाजातला घंटानादही होता. मुख्य कमानीपासून थेट सांताच्या ऑफिसपर्यंत सरळ पांढरा पट्टा जमिनीवर आखलेला आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर आखलेली ही आर्क्टिक रेषा आता आपण खरच ओलांडणार ही कल्पनाच अंगावर रोमांच आणणारी होती.

त्यावर पाय ठेवतांना काय वाटले हे शब्दात वर्णन करणे कठीण आहे.

उन्हाळ्यात आर्क्टिक रेषेच्या उत्तरेला सूर्य ओव्हरटाईम करतो व निदान २-३ दिवस तरी तो २४ तास ड्यूटीवर असतो. जसजसे उत्तरेला जावे तसतशी सूर्याची रजा कमी कमी होत जाते आणि २४ तासाची ड्युटी सूर्यदेव करू लागतात. याउलट हिवाळ्यात सूर्यदेव पूर्णपणे दांडी मारतात. म्हणजे २४ तास फक्त संधिप्रकाश किंवा रात्रच असते. या सगळ्याची शाळेत मार्कांसाठी घोकंपट्टी केली होती. आता ते प्रत्यक्ष अनुभवत होतो. आर्क्टिक रेषेवर उभे रहाण्याचा थरार पुरेसा झाल्यावर आम्ही सांताच्या ऑफिस कम घराकडे निघालो.


JOULUPUKIN
KAMMARI
SANTA CLAUS
OFFICE
CAFE
RESTAURANT



वरवर साध्यासुध्या घरासारखे दिसणारे हे तीन मजली ऑफिस त्याच्या छतावर लावलेल्या सांताच्या भव्य चित्रामुळे व दाराबाहेरच्या बिनचाकाच्या गाडीमुळे लगेच ओळखू येते.

“चला बाई, एवढं लांब आलो तसे सांताक्लॉजचे घर तरी बघायला मिळाले. ”

“ हो बाई, कधी आपण सांतक्लॉजच्या घरी येऊ असं वाटल नव्हत हो! ”

“इथवर आल्याचं सार्थक झालं असं म्हणायचं! ”

“आता सांतासाहेब दिसले म्हणजे झाल! ते घरी असतील ना हो? ”

“नसले तरी काय झाल? आपण थोडेच त्यांना कळवून आलोत? त्यांची त्यांना कामं असणारच”

अश्या अर्थाची पण वेगवेगळ्या भाषेतील वाक्ये आसपास ऐकू येत होती. आमच्याही गृपमध्ये अशीच वाक्ये बोलली जात होती. शेवटी “नसतील सांतासाहेब तर नसू देत. आपण त्यांचे घर, ऑफिस तर बघू” अशी चर्चा खरतर कितीही वेळ चालली असती. पण गाईड साहेबांना वेळ फुकट घालवणे फारसे मंजूर नव्हते.

“प्रथम त्याचे पोस्ट ऑफिस पाहू. इथून जगभरच्या चहात्यांच्या पत्रांना स्वतः सांतासाहेब उत्तरे पाठवतात. ”असे सांगत आमचा मोर्चा गाईडसाहेबांनी सांताक्लॉजच्या घराशेजारील पोस्ट ऑफिसकडे वळवला. भलेमोठे चौरस डेस्क, सांताची खुर्ची, पेन, शाई व भरपूर कप्पे असणारे शेल्फ अशी सुटसुटीत मांडणी असणारे हे ऑफिस कमालीचे स्वच्छ होते. त-हेत-हेची शुभेच्छा पत्रे, पाकिटे शेल्फामधे व्यवस्थीत रचून ठेवलेली होती. हे पोस्टऑफिस तीन चार चुणचुणीत गोऱ्यापान मुली सांभाळत होत्या. आपण कार्ड विकत घेऊन त्यावर पत्ता व तिकीट लावून त्यांच्याकडे द्यायचं. म्हणजे ते सांतासाहेबांच्या सहीशिक्क्यानिशी त्या पत्त्यावर रवाना होतं. त्यावर रोवानिएमी/फिनलंडचा शिक्का न येता

’सांताक्लॉज पोस्टाचा’ शिक्का येतो. एका बोर्डावर सांताने आपल्या किती चहात्यांना पत्रे लिहिली याचा आकडा होता. जगभरातून लाखो मुले त्याला दरवर्षी पत्रे लिहितात. येणाऱ्या प्रत्येक पत्राला तो स्वतः उत्तर देतो असे म्हणतात.

“चला, आपण आत सांतासाहेबांच्या ऑफिस कम घरामध्ये जाऊ”असे म्हणत गाईड साहेबांनी आम्हाला सांताक्लॉजच्या घराकडे वळवले. सांताच्या घराच्या चार पायऱ्या चढलो ते ”सांता इथे नसणारच, त्याच्या वस्तू, घराचा आतला भाग पाहून परतू” अशी खात्री मनात बाळगूनच.

बसमधून उतरून बराच वेळ झाला होता, सांताव्हिलेजचा काही भागही पाहून झाला होता. अजूनतरी ’तो’ कुठे भेटला नव्हता. ऑफिसात काय, फार तर क्लार्क लोकांची टेबले व इतर गोष्टी असणार या समजूतीतच बाहेर ठेवलेली गाडी, वेगवेगळे फोटो, बर्फातल्या प्राण्यांची कातडी, रेनडियरची शिंगे इ. गोष्टी पहात आम्ही पुढे सरकत होतो. एका मोठ्या पॅनलवर सांताची माहितीही वाचायला मिळाली.

सांता आपल्याला माहीत असतो तो दरवर्षी नाताळमध्ये येणारा म्हातारा, प्रेमळ, कनवाळू आजोबा म्हणून. सांतक्लॉजचे मूळ गाव कोणते याबद्दल बरेच वेगवेगळे मतप्रवाह आहेत. पण सांताक्लॉज हे तुर्कस्तानातील मायरा या गावात जन्मलेले असावेत असे बरेचजण मानतात. त्यांचा मृत्यू इटलीतील बारी या गावी झाला असेही एक मत आहे. सांता स्पेन मधून येतो असाही समज आहे. मूळचे ४थ्या शतकातले तुर्कस्थानातील बिशप सेंट -- संत निकोलस गरीबांना मदत करीत. आजूबाजूच्या मुलाबाळांना ते खेळणी, भेट पैसे वगैरे मदत स्वरूपात देत असत. अत्यंत कनवाळू म्हणून ते त्या भागात प्रसिद्ध होते. संत निकोलसचे सांता निकोलस व नंतर त्याचेच सांताक्लॉज हे नाव प्रचलीत झाले. गरीबांना भेट वस्तू देणे व मदत करणे ही परंपरा पुढे सांताक्लॉजच्या रूपात चालू राहिली. आम्ही भेट दिली ते १९२० मध्ये फिनलंडमधील कुरवातुंतुरी या डोंगरावर रहाणारे सांता. हा डोंगर आपल्या कानाच्या आकाराचा आहे. त्यामुळे तिथे रहाणाऱ्या सांताला जगातल्या सर्व लोकांच्या हाका ऐकू येतात असं म्हणे. ४८३ मी. उंचीचा हा डोंगर दुर्गम आहे. त्यावर जाण्याचा मार्ग फक्त श्री. व सौ. सांता, त्यांची जादूची हरिणे व त्यांच्या देवदूतासारख्या सेवकांनाच माहीत आहे. त्यांच्या साहाय्यानेच ते एका रात्रीत जगभर संचार करू शकतात अशीही दंतकथा आहे. १९५० पर्यंत सांता रोवानिएमी

या गावात डोंगरउतरून वरचेवर येत असे, पण १९८५ पासून त्याने आपले खेडेच इथे वसवले. आणखीही खूप काही लिहिलेले होते. पण तेव्हढा दम आता निघत नव्हता.



पायऱ्यांच्या समोर एक लांबलचक कॉरिडॉर होता व उजव्या हाताला एक खोली. इतक्या वेळात आम्हाला एकही माणूस भेटला नव्हता – ना हटकायला, ना आमच्यासारखा प्रवासी. आजूबाजूला कोणीच कसे नाही याचे आश्चर्य वाटत होते. ती खोलीही सहजासहजी दिसण्यासारखी नव्हती. त्यामुळे कॉरिडॉर पाहून आम्ही माघारी वळण्याच्याच बेतात होतो तोच "हॅल्लो फ्रेन्ड्स" असा गोड आवाज व त्या पाठोपाठ पायघोळ अंगरखा घातलेला, उंच, उंचीला योग्य अंगाबेताचा, गोरापान चश्मेवाला माणूस अवतरला. "या मित्रांनो, सांताक्लॉजच्या ऑफिसमधे स्वागत आहे. या असे पुढे या" हे ऐकून हा कोणी बाबू असावा, सांता साहेबांच्या अनुपस्थितीबद्दल कदाचित दिलगीरी

व्यक्त करणार असावा याची खात्री बाळगत पुढे सरकत होतो तोच पुढचे “या, आत या. सांताक्लॉज तुमची वाट पहात आहे” हे शब्द ऐकून अवाकच झालो. सांता ‘आपली’ वाट पहात थांबला आहे या कल्पनेनेच अपरिमित आनंद झाला. खोलीत गेलो तो काय!

’सांताक्लॉज’ स्वतः एका प्रशस्त खुर्चीवर बसून आमचे स्वागत करीत होते... लाल रंगाचा पांढऱ्या किनारपट्टीचा पोशाख -- अंगरखा, तसाच पायघोळ व भरपूर ढगळ पायजमा. पोटावर रुळणारी भली मोठी पांढरी शुभ्र दाढी, कानावरचे कल्ले, मोठ्या छपरी मिशा, गोल भिंगाचा सोनेरी चष्मा, पांढऱ्या गोंड्याची लाल टोपी, भले मोठे कातडी बूट मोजे... सगळे पहाताना आपण स्वप्नात तर नाहीना असे वाटत होते. धिप्पाड नव्हे पण सुदृढ वयस्कर व्यक्तिमत्त्व, गोरापान रंग, नितळ त्वचा, हालचालीतला वयाला शोभेसा संथपणा, चेहऱ्यावरच्या अस्पष्टशा सुरकुत्या, लांबसडक बोटं असणारा किंचित नाजुकसा पंजा.. सगळं काही सांताक्लॉजच्या चित्रासारखं वाटत होतं. पिवळी झाक असणारा गोरापान रंग लाल कपड्यात उठून दिसत होता. निळे निळे डोळे अगदी नजर खिळवून ठेवत होते. चेहऱ्यावरचं प्रेमळ हसू त्याच्या

दाढीमिशामधूनही वातावरण प्रसन्न ठेवत होतं. जुन्या कथांमधला सांता तो हा नव्हे हे माहीत असूनही अगदी अस्सल वाटत होता. भारलेल्या अवस्थेतच आम्ही पुढे गेलो.

त्या भल्यामोठ्या खोलीत सांताच्या आसनाखेरीज भली मोठी फायरप्लेस, कोपऱ्यात उभा असणारा चमकणारा ख्रिसमस ट्री, खरी खोटी झुडुपे, प्राचीनकालीन वाटणाऱ्या मातीच्या फुलदाण्या, जमीन, छतावरची तुळई, रेनडियरचे पुतळे – सगळे काही अगदी खरेखुरे भासत होते. एवढे सगळे निरीक्षण करून होतंय तोच "वेलकम फ्रेण्डस, वेलकम इन माय ऑफिस" असे खुद्द सांताने केलेले स्वागत ऐकून आम्ही पूर्णपणे भारावून गेलो. तो खुर्चीत बसला होता. लांबहात करून त्याने आमचे हात हातात घेतले व जवळ बसायला सांगितले. आम्ही त्याच्या जवळ बसताच तिथल्याच फोटोग्राफरने आमचे त्याच्याबरोबर फोटो काढले. आम्ही अगदी मंत्रमुग्ध होऊन सांताकडे पहात होतो.

त्याने आम्हाला जवळ बसवून कोठून आलात, मूळ देश कोणता, उद्योग व्यवसाय काय याची चौकशी सुरू केली तेव्हा त्याच्या आवाजातली जादू खरी जाणवली. अगदी खोलवरून येणारा गूढ पण गोड आवाज कान तृप्त करत होता.



आजूबाजूचे सर्व काही विसरायला लावणारा त्याचा आवाज आता खोलीभर पसरला होता आणि सोनेरी चष्म्यातून त्याचे निळे निळे प्रेमळ डोळे मनाच्या तळापर्यंत वेध घेत होते.

त्याने जेव्हा आमच्या मुलाबाळांची चौकशी करायला सुरुवात केली तेव्हा तर तो प्रेमळ आजोबाच वाटून गेला. त्यानंतर त्याने आमच्या देशाला केव्हा भेट दिली होती तेही सांगितले - म्हणजे गेल्या ख्रिसमसला... (आणि अर्थात तो प्रत्येकाला तसेच सांगणार कारण दरच ख्रिसमसला सांता जगात सर्वत्र हिंडतो) . सकाळी फारशी गर्दी नसल्याने त्याने आमच्याशी जवळजवळ अर्धा तास गप्पा मारल्या. पण त्याचा आवाज सोडला तर त्याने काय विचारले आणि आम्ही काय सांगितले, काही म्हणता काही आठवत नाही. आठवतो तो फक्त त्याचा आवाज आणि नजर! आजही सांता म्हटले की तो आवाज कानात घुमू लागतो व अंगावर रोमांच उभे रहातात आणि त्या अनोख्या अविस्मरणीय भेटीची आठवण मनात ताजी होते.

*(हा लेख यापूर्वी 'साप्ताहिक सकाळ २८ डिसें २०१३' या अंकात प्रसिद्ध झाला आहे)*

# ले गया दिल, साकुरा जपानका...



आम्ही कॉलेज मध्ये असण्याच्या वयात रेडिओवर ` बिनाका गीतमाले' मध्ये जवळजवळ दर बुधवारी २ गाणी हमखास लागायची—' ले गयी दिल गुडिया जपानकी', व 'ऍन इव्हिनींग इन पॅरिस'. सगळयाच माणसांना या गाण्यांनी

जणू वेड लावल होतं म्हणाना! तरूणांच्या मनावर तर त्या गाण्यांनी गारूडच केलं होतं. आम्ही पण त्या वयात होतो. त्यामुळे हे देश कसे असतील, विशेषतः जपान कसे असेल, किमोनो घातलेल्या बाहुली सारख्या दिसणाऱ्या गोंडस मुली, लगबग करत चालणारी व सदैव उद्योगात मग्न असणारी माणसे याविषयीचे कुतूहल मनात खूप पूर्वीपासून घर करून होते. खरतर जपान अगदी लहान वयातच माहिती झाला होता. त्या देशातील लोकांनी दुसऱ्या महायुद्धातून देश वर आणण्यासाठी घेतलेले अविरत कष्ट, राष्ट्राला परत जगाच्या नकाशात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी केलेली मेहनत शालेय जीवनापासून ओळखीची झालेली होती. त्यामुळे जपान पहायला जाण्याची इच्छा संधी मिळताच उसळी मारून वर आली.

भारताच्या पूर्वेला अगदी चिंचोळा, चारी बाजूंनी समुद्राचे संराक्षण असणारा, निसर्गसौंदर्याने नटलेला चिमुकला देश. हिमालयाच्या काही शिखरांशी स्पर्धाकरू पहाणारा माऊंट ‘फुजी’सारखा पर्वत, लेक ‘अशी’ सारखी विस्तीर्ण व निर्मळ तळी, ‘पॅगोडा’ सारख्या उतरत्या छपरांच्या वैशिष्ठ्यपूर्ण इमारती, रस्त्याचे चढ उतार, त्यावरून लगबगीने चालणारी मध्यम उंचीची गोरीपान चपट्यानाकाची माणसे… कायकाय अन कशाकशाचं वर्णन ऐकावं… पण त्यातही

तिथल्या चेरिब्लॉसमच्या वर्णनांनी मनावर भुरळ घातली अन जरी ऑस्ट्रेलिया, अमेरिकेतील ब्लॉसम बघितला होता तरी जपानचा चेरिब्लॉसम पहायला जायचच अस ठरवून एका वर्षी एप्रिलच्या पहिल्याच आठवड्यात जपानकडे कूच केले.

जपान हा मुळातच देखणा देश. एखादी रूपवती नार पूर्ण यौवनात असावी व त्यातही ती सालंकृत नटावी तसे जपान 'साकुराच्या' म्हणजे 'चेरिब्लॉसमच्या' दिवसात दिसते. खूप वर्षांपूर्वी जपानमध्ये 'इंपीरियल पॅलेसचा' परिसर सजवण्यासाठी उत्तर भागात आढळणाऱ्या 'प्रुनस' या जातीतील विविध प्रकारच्या झाडांची लागवड केली व बघताबघता त्याची जपानभर भरभराट झाली. या झाडांना जपानमधला उन्हाळा सुरू होण्याच्या वेळेला वर्षभरातून एकदाच पांढरी, गुलाबी, पिवळसर रंगांची, क्वचित पांढऱ्या फुलांवर राखाडी छटासुद्धा असलेली असंख्य छोटी छोटी फुले येतात. जपानमध्ये प्रामुख्याने 'प्रुनस सेरूलता' म्हणजेच 'जॅपनीज चेरीज''या जातीची झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात. याखेरीज जवळ जवळ २० प्रकारची याच गटातील झाडेही यात मोडतात. या झाडांना जी फुले येतात त्यांचे गुच्छ असतात. प्रत्येक गुच्छात ३ ते ५ फुले असतात. पण सगळी फुले फुलली की जो मोठ्ठा घोस तयार होतो तो अगदी

एखाद्या ढगासारखा दिसतो. त्यावरूनच या झाडांच्या फुलांच्या अप्रतिम बहराला जपानी भाषेत ‘साकुरा’ म्हणतात. थंडीत पानगळ झालेली असते, सूर्य प्रकाशाचा अभाव जाणवतो व संपूर्ण वातावरणातच थोडी मरगळ येते. अशा वेळी, उन्हाळ्याच्या सुरूवातीला फुलणाऱ्या या फुलांच्या बहरामुळे प्रसन्नता येते म्हणून या बहराला चेरिब्लॉसम असेही म्हणतात. गळलेल्या पानांमुळे ओक्याबोक्या झालेल्या फांदीचा थोडासुद्धा भाग दिसू नये इतका या फुलांचा बहर असतो. या फुलांचे आयुष्य जेमतेम एक आठवड्याएवढेच असते. त्याच कालावधीत दिसणाऱ्या या फुलांच्या सौंदर्याचा उपयोग पर्यटकांना आकर्षित करण्याकरता जपानमध्ये भरपूर करून घेतलेला दिसतो. आता तर जपानमधील चेरिब्लॉसमचा बहर बघायला जाणे हा एक जागतिक इव्हेंट झालेला आहे. प्रत्येक वर्षाच्या सुरूवातीलाच जपानच्या कोणकोणत्या भागात केव्हां साकुराचा बहर असणार आहे याचे अचूक वेळापत्रक जाहीर केले जाते. (हा बहरही अगदी आज्ञाधारकपणे बरोबर त्याच दिवसात येतो हे विशेष) . संपूर्ण जपानभर ही झाडे फुललेली असतात. अगदी रस्त्याच्या कडेला सुद्धा. पण ती झाडे येता जाता पाहून लोकांनी समाधान करून घ्यावे याऐवजी हा बहर पहाण्यासाठी, तो मनमुराद उपभोगण्यासाठी जपान सरकारने ठिकठिकाणी बागा तयार केलेल्या आहेत. हा बहर प्रत्येक ठिकाणी फक्त चार-सहा

दिवसच टिकतो. सौंदर्याच्या आस्वादाबरोबरच या फुलांच्या बहराचे भावनिक नाते भगवान बुद्धांच्या कृपाप्रसादाशीही जोडले जाते. त्यामुळे पर्यटकच काय पण जपानी नागरिकही जास्तीत जास्त बागांना भेटी देण्याचा प्रयत्न करतात. आम्ही तर काय हाच बहर पहाण्यासाठी आलेलो. त्यामुळे जास्तीत जास्त सौंदर्य पहाणे व कॅमेऱ्यात कैद करणे यात मग्न झालो तर नवल नाही.

आम्ही टोकियोमधला बहर पहाण्यासाठी एप्रिलच्या ४ ता. ला नरिटा विमानतळावर टेकलो व आमच्या ‘प्रिन्स हॉटेल’ मध्ये जाण्यासाठी शिनागावा स्टेशन गाठले. संध्याकाळची वेळ होती त्यामुळे हॉटेलच्या खोलीतून आजुबाजूचा परिसर फारसा दिसत नव्हता. पण आमच्यासाठी सौंदर्याची कोणती मेजवानी वाट पहात आहे याची झलक हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्यावरच आली. रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या प्रफुल्लित झाडांच्या कमानींनी आमचे स्वागत केले. फूटपाथच्या बाजूला पडलेला सडाही मोठा आकर्षक दिसत होता. १४ व्या मजल्यावरच्या खोलीच्या गॅलरीतून खाली पाहिल्यावर फक्त झाडांचे एकात एक गुंतलेले शेंडे दिसत होते.



सकाळी सकाळी जाग आल्यावर प्रथम गॅलरीकडे मोर्चा वळवला. कालचेच दृश्य आज एकदम वेगळे दिसले. आमच्या गॅलरीतून लांबवरचे दृश्य दिसत होते. आकाशाला गवसणी घालू पहाणाऱ्या उंच इमारती एकमेकींशी स्पर्धा करीत होत्या. पण खाली वाकून पाहिले तर अगदी वेगळाच नजारा दिसत होता. सगळीकडे कळयाच कळय़ा. काही मुक्या, काही अर्धोन्मिलीत तर काही पूर्ण फुलून फुलात रूपांतरित झालेल्या. त्यांचा पांढरट गुलाबी रंग नाजूक कोवळया फांद्यांना झाकून टाकत होता. पाने अगदी तुरळक-- नगण्यच म्हणाना. त्या सगळयांच्या फटीतून खाली जमिनीवर पडलेले उन्हाचे कवडसे मोठे मस्त दिसत होते. जपानमधल्या चेरिब्लॉसमचे वैभव दाखवणारे ‘शिनागावा उद्यान’ अगदी आमच्या हॉटेलच्या खालीच आपल्या पूर्ण दिमाखात आपला पसारा मांडून आम्हाला बोलावत होते. त्या आमंत्रणाला मान देऊन आम्ही लगेचच खाली गेलो.

खाली आल्यावर खालून वर पहाताना आता बागेचा पसारा खूप वेगळा दिसत होता. इतका वेळ मोठ्या झाडांमुळे न दिसलेले ट्यूलिप्स, वेगवेगळया रंगांचे गुलाब, ऑफिस लिलिज पूर्ण फुललेल्या होत्या. मोठ्या झाडांच्या भोवती या फुलझाडांची रांगोळी मोठी आकर्षक दिसत होती. जागोजागी छोटयाछोट्य़ा पुष्करणी, त्यांच्याभोवती फुलझाडांची महिरप, त्यांच्यावर आपल्य़ा पाने, फुले, फांद्यांच्या पसाऱ्याची मेघडंबरी तोलून धरणारी प्रुनस जातीची झाडे व त्यांच्यावर उमलू पहाणारी छोटी छोटी फुले... या सगळयांच्या मधून मुद्दाम केलेल्या फरसबंदी पायवाटेवरून चालताना खूपच मजा वाटत होती. बागेचा आकार जरी खूप मोठ्ठा नव्हता तरी बाग खूप सुंदर होती हे नक्कीच. बागेच्या नैसर्गिक चढउतारांचा बागेची शोभा वाढवण्यासाठी मोठ्या कौशल्याने उपयोग केला होता. ठिकठिकाणी लाकडी प्लॅटफॉर्म, काही ठिकाणी पायऱ्या, काही ठिकाणी बसण्याचे बाक तर कुठे लाकडी गॅलऱ्या केल्या होत्या. संध्याकाळच्यावेळी तिथे जपानचा प्रसिद्ध ‘टी सेरिमनी’’आयोजित केला जातो. त्या लाकडी फरसबंदीवरून आजुबाजूचे सौंदर्य डोळयात साठवत फिरताना दिवस कसा मावळला तेच कळले नाही.








संध्याकाळचा झाडांचा नजारा काही औरच होता. सूर्याची केशरी, सोनेरी किरणे लेऊन फुलांचा रंग आणखीनच वेगळा नयनरम्य दिसत होता. काल रात्री हॉटेलकडे आम्हाला घेऊन आलेला रस्ता आज अगदीच वेगळा दिसत होता. मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या छोट्या रस्त्यावर दोन्हीबाजूंनी असणारी **झाडे हलक्याश्या वाऱ्याच्या झुळुकेवर डोलत आमच्यावर छत्रचामरे ढाळताहेत व कोणीतरी आमच्यासाठी “बा आदब... बा मुलाहीजा... ”अशी ललकारी देते आहे** असा भास आम्हाला उगीचच होऊ लागला होता. आमची पावले आपोआपच तालात पडू लागली. टोकियो शहरात मनसोक्त भटकून थकले भागले पाय घेऊन आम्ही हॉटेलकडे वळलो.



अनामिका बोरकर



बागेत झाडांच्या फांद्यांवर झाडांच्या फुललेल्या शेंड्याकडे नेमका प्रकाशझोत टाकणारे दिवे होते. त्यामुळे रात्रीचा साकुराही विलक्षण खुलून दिसत होता. पायवाटेच्या दोन्हीबाजूंना जमिनीकडे उजेड टाकणारे दिवे अदबीने उभे होते. चिनी-जपानी पद्धतीचे लाल नारिंगी रंगांचे कागदी व रेशमी शोभेचे दिवे बागेची शोभा वाढवत वाऱ्याच्या झुळकेबरोबर मंद हेलकावे खात होते. आता दिव्यांच्या प्रकाशात फुलांचे रंग आणखीनच मोहक झाले होते. लाकडी पायऱ्यापायऱ्या करून मध्येच एक छोटासा प्लॅटफॉर्म तयार केलेला सकाळी बाहेर जाताना पाहिला होता. आता त्याच्यावर लाल सोनेरी नक्षी काढलेला हिरव्या रंगाचा गालीचा अंथरलेला होता. गालीच्याच्या एका टोकाला १-२ कलाकार जपानी वाद्ये वाजवीत आपली कला सादर करीत होते, तर मधोमध तक्क्याला टेकून ३-४ मंडळी मस्त, आनंदी मुडमध्ये गप्पा मारत होती. त्यांच्यापासून योग्य ते अंतर राखून एक दोन जपानी गेईशा—म्हणजे अमीर उमरावांच्या करमणूकीसाठी खास शिक्षण घेतलेल्या जपानी स्त्रिया-- त्या लोकांशी गप्पा मारत, नर्म विनोद करीत खास जपानी पारंपारिक किमोनो घालून बसल्या होत्या. मुळातच गोऱ्यापान अशा त्या गेईशा त्यांच्या खास वेषभूषेमुळे व रंगभूषेमुळे स्वर्गातील अप्सरा असाव्यात असा भास होत होता. त्यांचे ते आदब राखून यजमानांशी बोलणे, हावभाव, त्यांना सोनेरी नक्षीच्या

किटलीतून खास जपानी छोट्याछोट्या कपातून चहा देतानाची नजाकत... सगळेच अप्रतीम! हाच तो जपानमधला ‘टी सेरीमनी’! सर्व बोलणे, विनोद, गप्पा जपानी भाषेतल्या असल्याने अर्थ समजत नव्हता. पण हावभाव व हलचाली पहायलाही खूप गंमत वाटली.

सकाळी बागेत आलो तर आज कळया थोड्या जास्त प्रमाणात उमललेल्या होत्या. आता जमिनीवर पडणारे उन्हाचे कवडसे कमी झाल्याचे दिसत होते. बाकीची बाग तशीच आनंदी व प्रसन्न होती. हे सगळे पहात आज दुसऱ्या बागेकडे जाण्यासाठी निघालो होतो. पण ही बाग काही आमचे पाय बाहेर पडू देत नव्हती. किती पहावे तेवढे थोडेच असे वाटत होते. या सगळ्या सौंदर्यात भर पडावी म्हणून की काय त्या दिवशी एक जपानी पद्धतीचा पोशाख केलेले नवपरिणीत जोडपे बागेतून हिंडत आपले ‘मिलनाचे संकेतस्थळ’ फोटोग्राफरच्या मदतीने कॅमेऱ्यात टिपत होते. आम्हाला त्यामुळे अगदी खेळण्य़ातील बाहुलाबाहुली वाटावी अशी लालचुटूक जपानी पोशाखातली नवरानवरी अनपेक्षितपणे जवळून न्याहाळता आली.

दिवसेंदिवस बागेचा डौल काही वेगळाच दिसू लागला होता. हॉटेल मधून खाली पाहिले तर पांढऱ्या, गुलाबी रंगाच्या फुलांचा गालिचा जास्त घट्ट विणीचा होत चालला होता, फुले खूप प्रमाणात उमलली होती. पुढचे २-३ दिवसात हा गालिचा पूर्ण दाट झाला व जिकडे पहावे तिकडे फक्त पांढरा व गुलाबी रंगच दिसायला लागला. त्यावर फुलांचा मध खाण्यासाठी येणारे पक्षी व कीटकही दिसायला लागले. बागेत उतरून पाहिले तर आकाश नाहीसे होऊन फुलांची मेघडंबरी बागेवर आच्छादल्यासारखे दृश्य दिसत होते. ५ व्या दिवसानंतर ह्ळूहळू फुलांचा रंग विटायला लागला, आकार लहानलहान व्हायला लागला, पाकळ्या गळू लागल्या. बागेत तर पाकळ्यांचा सडा पडायला लागला. जोराचा वारा आला की त्याबरोबर तरंगत पाकळ्यांची जी रंगीबेरंगी मिरवणूक निघे ती अगदी बघत रहावी अशी होती. आणि आपण त्यात अवचित सापडलो की अशी मस्त मजा येते की काय सांगू... आपल्या दोन्ही बाजूंनी थंडगार वारा वहात असतो. त्याच्याबरोबर वहात येणाऱ्या नाजूक फुलांच्या मृदुमुलायम पाकळ्या दोन्ही बाजूंनी आपल्याला खेटून वाऱ्याशी शर्यत करत पुढेपुढे धावत असतात तर आपल्या पाठीला चिकटलेल्या पाकळ्या गुदगुल्या करत असतात. समजा वाऱ्याचा झोत आपल्या समोरून आडवा जात असेल तर खूप छोटीछोटी फुलपाखरे अगदी एकमेकांना खेटून

उडत आहेत असा भास होतो. टोकियोमधल्या ज्या १० बागा 'साकुराच्या' खास दर्शनासाठी तयार केलेल्या आहेत, त्यातली 'शिनागावा गार्डन' प्रिन्स हॉटेलमधल्या आमच्या मुक्कामात अगदी सहज पहाता आली. इतकेच नव्हे तर फुलांच्या उमलण्यापासून बागेतले होणारे सगळे बदल अनुभवता आले.

माणसाची थोडक्यात कधी तृप्ती होत नाही. आमचेही तसेच होते. जपानमधला हा साकुराचा बहर वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया वेळी पूर्णपणे फुलतो. तो 'शिंजूकू गिऑन उद्याना'त पूर्णत्वाला पोहोचल्याचे कळल्यावर आम्ही ते उद्यान पहायला गेलो. शिंजूकू स्टेशनपासून चालत अगदी ५ मिनीटांच्या अंतरावरच हे उद्यान आहे. 'इडो' कालखंडात जपानचे मूळचे रहिवासी 'नाईटो' कुटुंबियांनी त्यांच्या परिसरात ही बाग प्रथम स्वतःपुरती, मग आसपासच्या लोकांच्यासाठी तयार केली. आता ती मिनिस्ट्री ऑफ एन्व्हायरन्मेंटने विकसित करून सर्वांसाठी खुली केली. सुमारे ६० हेक्टर आकारमान असलेली ही प्रचंड मोठी बाग साधारण गोल आकारात आहे. ३. ५ ते४ किमी. इतका हिचा घेर आहे. बागेच्या मधोमध अंदाजे १ कि. मी. चालले की दुसरे टोक गाठता येते इतका मोठा या उद्यानाचा पसारा आहे.





बाग फ्रेंच, इंग्लिश व जपानी अशा तीन भागात विभागलेली आहे. प्रत्येक विभाग आपआपल्या देशाची वैशिष्ट्ये दाखवतो. फ्रेंच विभागात गुलाबाच्या असंख्य जाती पहायला मिळतात, इंग्लिश विभागात लांबचलांब पसरलेली हिरव्यागार गवताची कुरणे तर जपानी भागात लहानमोठी तळी, त्यांच्यावरचे छोटेमोठे पूल, पॅगोडा पहायला मिळतात. या उद्यानात अंदाजे २०००० तरी झाडे असतील. यापैकी नुसती प्रुनस जातीची १५०० ते २००० झाडे आहेत. या

शिवाय हिमालयन सेडर्स, सायप्रस वृक्षही मोठ्या प्रमाणात आहेत. ट्यूलिप, गुलाब तर जागोजागी दिसतात. या बागेत हिरोहितो या तैवानी राजकुमाराला तैवानमधल्या लोकांनी प्रेमाने भेट दिलेले तैवानी पॅव्हेलियनही आहे. या बागेच्या मधोमध असलेल्या रस्त्याच्या दुतर्फा चेरिब्लॉसम पूर्ण बहरात असलेला दिसत होता. दोन्हीबाजूंच्या झाडांच्या फांद्या एकमेकात पूर्ण गुंतून त्याची या रस्त्यावर फुलांची मनमोहक लांबलचक छत्री तयार झाली होती. पांढऱ्या गुलाबी फुलांच्या खाली असणाऱ्या फांद्यांवर टांगलेले लाल, केशरी रंगांचे दिवे व रंगीबेरंगी पताकांच्या माळा वाऱ्यावर झोके घेत सगळ्या सौंदर्यात भरच घालत होत्या. त्या छत्रीखालून चालताना अंतर कसे संपले ते कळलेच नाही. या बागेत खूप पूर्वीपासून फुलांच्या सौंदर्यावर कविता रचण्याची, त्यांचे नयनमनोहर चित्र काढण्याची, ती चित्रे रंगवण्याची पद्धत आहे. आता या सगळ्याबरोबरच सर्व कुटुंबियांनी एकत्र जमून या झाडांखाली एक दिवस आरामात मनसोक्त गप्पाटप्पा करत, खाणेपिणे करत घालवायचा हीही कल्पना रूढ झाली आहे. त्यासाठी खानपान सेवा पुरविणारी छोटीछोटी उपहारगृहेही आपला पसारा मांडून बसलेली होती.





यानंतर आम्ही गेलो ते ऊएनो (उनो) पार्क पहायला. ही बागही ऊएनो स्टेशनच्या जवळच होती. लोकलमधून उतरल्यावर कोणाला 'पार्कमध्ये कुणीकडून जायचे' हे विचारावे लागलेच नाही. गाडीतून उतरलेल्या लोकांच्या लोंढ्यामागोमाग आपण फक्त चालत रहायचे की आपण बागेतच प्रवेश करतो. अगदी गणपतीच्या दिवसातल्या गर्दीची आठवण झाली. या बागेला सुमारे ४०० वर्षांचा जुना इतिहास आहे. एकंदर ८००० झाडांपैकी सुमारे ११०० ते १२०० झाडे चेरीब्लॉसमचे वैभव आपल्या अंगाखांद्यावर मिरवणारी होती. या झाडांवर केशरी, लाल, पिवळे दिवे व पताकांच्या माळा होत्याच पण जवळजवळ प्रत्येक झाडाखाली निळ्या, हिरव्या, पिवळया रंगांची प्लॅस्टिकची ताडपत्री नीटसपणे अंथरलेली होती. कुठेकुठे त्यांच्या भोवती दोऱ्या बांधून

पाट्याही लावलेल्या होत्या. त्या अर्थात जपानी भाषेत असल्याने आम्हाला कळल्या नाहीत पण जरा एकदोघे इंग्लिश जाणकार हेरल्यावर उलगडा झाला की टोकियो मधल्या मोठमोठ्या कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसाठी या जागा राखीव केल्या आहेत. कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कुटूंबीयांसह तिथे येऊन वेळ घालवावा, मौजमजा करावी, खावे, प्यावे यासाठी ही सोय. फुलांच्या पूर्ण बहराचा आनंद उपभोगत गाणी गावी, काव्य रचावे, मजा करावी अशी पद्धत जपानमध्ये सुमारे ९व्या शतकापासून चालत आली आहे. त्याला ‘हनामी’ असेही एक नाव आहे. त्याचे पारंपारिक स्वरूप पालटून मौजमजा करणे व फुलांच्या बहराचा मनसोक्त उपभोग घेणे असे झाले आहे. खरोखरच डोळ्यांचे पारणे फिटावे असा एकंदर सगळा माहोल होता.

काही लोक जपानी पारंपारिक वेषातही आलेले होते. ते तर या झाडाखाली फिरताना खूपच छान दिसत होते. तेवढ्यात जोराचा वारा आला व फुलांच्या गळलेल्या पाकळ्यांचा शॉवरही अनुभवता आला. थंडगार वारा व त्यापेक्षा गार पडलेल्या पाकळ्यांचा वर्षाव अंगावर गोड शिरशिरी उठवून गेला. थोड्याच वेळात सूर्य क्षितीजाकडे झुकला व या बागेतली संध्याकाळची दिव्यांची शोभाही आम्हाला पहायला मिळाली.



अनामिका बोरकर





अनामिका बोरकर



नंतरच्च्या मुक्कामात क्योटोमधल्या ‘इंपिरीयल पॅलेसचा’, प्रसिद्ध ‘किं काकुजी’ देवळाच्या आसपासचा, ओसाका मधला चेरिब्लॉसम पाहिला. रेनबो ब्रिज, नदीतली छोटीशी सफर, आसाकुसा देऊळ... सगळीकडे शहरी भाग नसून फक्त बागाच बागा पसरलेल्या आहेत असा भास होत होता. उन्हाळ्याचे स्वागत अशा प्रसन्न वातावरणात, फुलांच्या, निसर्गाच्या सान्निद्ध्यात, कुटुंबियांबरोबर आनंदात करण्याची जपानी पद्ध्त खूपच छान आहे. कितीही पाहिलं, फिरलं तरी डोळयांना व कॅमेऱ्याची तृप्ती न होऊ देणारा हा चेरिब्लॉसमचा बहर पाहून म्हणावेसे वाटते...

“ले गया दिल, साकुरा जपानका..... ”

*(हा लेख यापूर्वी ‘मस्त भटकंती २०१५’ या अंकात प्रसिद्ध झाला आहे)*

# सिंगापूरचे “गॉंग सी फा चाय”

“जीवनमें एक बार जाना सिंगापूर” हे गाणं अगदी संवेदनाक्षम वयात अनेकदा ऐकलं होतं. तेंव्हा सिंगापूर नावाचा एक देश या पृथ्वीवर आहे या पलिकडे काही विशेष भावना मनात निर्माण झाली नव्हती. तिथे चिनी लोक जास्त आहेत इतकीच माहिती त्यावेळी होती. १९८७ साली मी तिथे प्रवासी म्हणून गेले होते तेव्हा मला सिंगापूर फारफार वेगळे वाटले होते. आम्ही तेव्हा ‘सरंगून रोड’ ह्या मिनी भारतात उतरलो होतो. ‘मुस्ताफा सेंटर’ मधली खरेदी, प्रेक्षणिय स्थळांना भेट देणे, ‘कोमला विलास’मध्ये इडली वडा खाणे व सरंगूनरोडवर हिंडणारे भरपूर भारतीय पोटभर पहाणे... यामुळे सिंगापूर हा परदेश नसून दक्षिण भारताचाच एक छोटासा हिस्सा असावा अशी माझी कल्पना झाली तर त्यात काही चूक नव्हते. त्यावेळी सिंगापूरला जाणाऱ्या सर्व प्रवाशांना जवळपास असेच वाटत असावे. पण त्याच देशात ‘सिंगापूर एअर लाईन्स’ मधल्या नोकरीसाठी जेव्हा १९९२साली रहिवासी म्हणून मुक्कामाला गेलो तेव्हा त्या देशाचे एकदम वेगळेच रूप समोर आले.

जगाच्या नकाशावरच्या छोट्याशा बिंदू एवढेच स्थान असणाऱ्या सिंगापूरच्या भूमीवर मी जेंव्हा माझ्या नवऱ्याबरोबर उतरले तेंव्हा माझेही सिंगापूरबद्दलचे द्न्यान एका ठिपक्याहून जास्त नव्हते. पण विमानातून बाहेर आल्यापासून सर्वत्र दिसणारी तिथली स्वच्छता, शिस्त, हिरवीगार वनश्री, ताजी टवटवीत फुले... काय बघू अन काय नको असे होऊन गेले. जगाच्या नकाशावर एकाद्या ठिपक्या एवढा छोटासा देश किती विविधतेने भरलेला आहे हे तिथे राहिल्याशिवाय समजत नाही. त्या स्वप्ननगरीतले आमचे पहिले घरटे ‘बेडॉक’ या गर्दीने गजबजलेल्या उपनगरात होते. भारतातील मुंबापुरीतून तिकडे गेल्यावर बेडॉकसारख्या भर बाजारात असलेल्या घरात मला खूपच ‘होमली’ वाटले. भारतीय चेहऱ्यांऐवजी सगळीकडे चिनी लोक होते, इतकाच काय तो फरक. बाकी दादरची पाध्ये चाळ व आमचा बेडॉकमधला ब्लॉक (आपण ज्याला सोसायटी म्हणतो त्याला तिकडे ब्लॉक म्हणतात) सारखाच. सिंगापूरला येईपर्यंत मी एकही चिनी माणूस दुरूनसुद्धा कधी बघितला नव्हता. त्यामुळे त्यांच्या देशात, त्यांच्या शेजारी रहाण्याच्या कल्पनेनेच मी भारून गेले होते, मनातून खूप उत्सुकही होते. एका एका मजल्यावर सरळ एका ओळीत ६ घरे असा चार मजल्यांचा आमचा ब्लॉक बेडॉकच्या भर बाजारात होता. सर्व घरांना जोडणारी समाईक गॅलरी तिथल्या जनजीवनाची

हळूहळू ओळख करून देण्याचे काम चोख पार पाडत होती. मध्ये मोठा चौक सोडून चारी बाजुंना चार ब्लॉक व मध्ये भाजी फळांचा बाजार अशी तिथली रचना होती. त्यातल्याच एका घरात राहून आम्ही तिथल्या लोकांच्या रहाणीमानाशी जुळवुन घेण्याच्या प्रयत्न करीत होतो.

आमच्या ब्लॉकमध्ये बहुतेक सगळे चिनी होते. बेताच्या उंचीचे, लहानखोर चणीचे, गौरवर्णीय आजी आजोबा व त्यांचा वीकेंडला येणारा २ वर्षाचा नातू एवढेच लोक मला येताजाता शेजारच्या घरात दिसत. आजोबा खालच्या उपहारगृहातून खाद्यपदार्थ ने आण करताना दिसत व आजीबाई साफसफाई करताना. ८ दिवस झाले तरी फक्त मंदस्मितापलिकडे आमची गाडी जाईना. कारण भाषेचा मोठ्ठा अडसर! ते सगळे फक्त मॅंडेरिन भाषा बोलणारे व मी उत्तम मराठी, सफाईदार हिंदी (!) व तोडकंमोडकं इंग्रजी बोलू शकणारी. आमच्यात संभाषण होणार कसं? पण एकूणच नव्या वातावरणात व नव्या देशातल्या रहाणीशी जुळवून घेण्यात मी एवढी गर्क होते की, ‘शेजाऱ्याशी काहीही संपर्क करू शकत नाही’ ही बाब फारशी महत्वाची वाटलीच नाही. पण एके दिवशी मात्र मी पार गोंधळून गेले. झालं असं की अचानक घराबाहेरच्या गॅलरीतून कागद जळाल्याचा वास येऊ लागला. जोपर्यंत तो कमी होता तोवर मी गप्प बसले.

पण जशी त्या वासाची तीव्रता वाढू लागली, तसे दार उघडून बाहेर बघणे आवश्यक झाले. शेजारचे आजोबा लाल रंगाच्या छोट्याश्या शेगडीत पेटते निखारे घालून त्यात एकामागोमाग एक कागद जाळीत होते. हळूहळू सुट्ट्या कागदांची जागा कागदांच्या थप्पीने घेतली. मी बाहेर गेले, गॅलरीच्या कठड्याला टेकून उभी राहिले तरी माझी अजिबात दखल न घेता ते आपले काम करतच होते. ह्या गोष्टीचे मला फारच नवल वाटले. सहज कागदांवर नजर गेली तर त्यावर काही चित्रे व अक्षरे छापलेली दिसली. तेंव्हा मात्र मनात थोडी भीती वाटली. यापूर्वी कधीही असे दृश्य पाहिले नव्हते. काय चाललंय ते कळेना, तेंव्हा पटकन आत जाऊन दार लावून



बसणेच माझ्या हाती होते. पुन्हा ८-१० दिवसांच्या अंतराने तोच प्रकार. दर ८-१० दिवसांनी जेंव्हा याच प्रकाराची पुनरावृत्ती व्हायला लागली तेंव्हा मात्र ह्यांनाही रहावेना. ऑफिसमधे चिनी सहकाऱ्याकडे विचारणा केल्यावर कळले की ती चिनी लोकांची त्यांच्या पूर्वजांसाठी प्रार्थना करण्याची व त्यांना मोक्षाच्या मार्गावर लागणाऱ्या वस्तू पुरवण्याची पद्धत आहे. त्या प्रसंगाने निर्माण झालेली उत्सुकता मला आता स्वस्थ बसू देईना.

भाषा न कळणाऱ्या ठिकाणी वाचनालयात जाऊन माहिती मिळवणे हाच एक मार्ग. मी त्याचाच अवलंब केला आणि माझ्यापुढे एक नवीनच संस्कृती उलगडत गेली, तसेच त्याच्या आणि आपल्या संस्कृती व चालीरीतींमधले साम्य सुद्धा. जसजसे दिवस पुढेपुढे सरकायला लागले तसतसे दारावर लावलेले लालभडक कापडाचे तोरण, दाराच्या दोन्ही बाजूला लावलेले खोक्यासारखे लाल देवघर, त्यात जळणाऱ्या मेणबत्त्या, उदबत्त्या, त्यात ठेवलेली संत्री, केक या सगळ्याबद्दलची भीती कमी झाली व उत्सुकता वाढली. तोपर्यंत शाब्दिक भाषेच्या पलिकडची जी हावभावांची व हातवाऱ्यांची भाषा असते त्यात मी बऱ्यापैकी पारंगत झाले व चिनी आजोबा आजींशीही संपर्क करून त्यांच्या कृतीची माहिती मिळवायला लागले. त्यांची परदेशी शिकणारी कन्यका थोड्या दिवसांसाठी घरी आली व तिच्याशी इंग्रजी

भाषेतून संभाषण करून शंका दूर करणे सोपे झाले. मी साडी नेसून ( सच्च लॉन्ग क्लॉथ) न पडता दिवसभर वावरते, घरातच दिवसातून ३-४ वेळा अन्नपदार्थ शिजवते, नॉनव्हेज खात नाही तरी जिवंत राहू शकते या सद्गुणांमुळे (!) हळूहळू माझा शिरकाव त्यांच्या घराच्या आतपर्यंत झाला व त्यांच्या चालीरीती जवळून पहायला मिळाल्या. आपल्या व त्यांच्या रीतीभातींतले साम्य व फरकही कळू लागले तशी मजा वाटायला लागली.

आपल्यासारखीच चिनी लोकांची चांद्र कालगणना आहे. त्यामुळे आपल्याप्रमाणेच त्यांच्या कालगणनेला इंग्रजी कालगणनेबरोबर जुळवून घेण्यासाठी दर तीन वर्षांनी एक चांद्रमास अधिक घालावा लागतो. आपल्या प्रत्येक वर्षाला वेगवेगळे नाव असते. तसेच त्यांचेही वर्ष वेगळ्या नावाचे असते. फरक इतकाच की त्यांच्या प्रत्येक वर्षाला एकेका प्राण्याचे नाव दिलेले असते. ती नावे १२ वर्षांनी पुनः येतात. त्यामुळे दर १२ वर्षांनी ही नावांची साखळी परत सुरू होते. आपल्या घरात देवघर असतं, त्यात देव असतात, चिनी लोक सुद्धा देवघरात देव मांडतात. रोज त्यांची पूजा करतात. आपल्यासारखीच तेही पूजेसाठी फुले वापरतात, फक्त आपण ती देवाच्या डोक्यावर वहातो, ते ती आरास केल्यासारखी समोर मांडतात. आपण देवासाठी वाटीत दूध ठेवतो, ते दुधाऐवजी पाणी व तांदळापासून तयार केलेली वाईन ठेवतात.

आपण फळांचा नैवेद्य देवाला दाखवतो, तेही तेच करतात. आपल्या दारात तुळस व तुळशीवृंदावन असते, त्यांच्या दारात ते कुंडीत डाळिंबाचे, लिंबाचे, संत्र्याचे झाड लावतात. आपण देवापुढे व दाराबाहेर तुळशीपाशी उदबत्ती लावतो, तेही लावतात. फरक इतकाच की आपण एक किंवा दोन इतक्याच उदबत्या एकावेळी लावतो, ते मात्र ७, ९ उदबत्त्या एकावेळी पेटवून ३ देवापुढे, ३ दाराबाहेर व १ कुंडीत लावतात. कधीकधी यापेक्षाही जास्त संख्येत उदबत्त्या लावतात्त. आपली व त्यांची हात जोडून नमस्कार करण्याची पद्धत एकच आहे, अगदी साष्टांग नमस्कार घालण्याची सुद्धा! आपण निरांजन लावतो, ते मेणाचे दिवे पेटवतात. आपण पितृपक्ष पाळतो, चिनी लोकही त्यांच्या पितरांसाठी चक्क एक महिनाभर 'हंग्री घोस्ट फेस्टव्हल' पाळतात. आपण आपल्या पितरांसाठी नैवेद्य घराबाहेर ठेवतो व घरात जमलेल्या नातेवाईकांसमवेत प्रसाद घेतो, तसेच तेही नैवेद्य तयार करून बागेत, घराबाहेर, रस्त्यावर ठेवतात व उरलेल्याचा प्रसाद सगळेजण घेतात. पूर्वी आपल्याकडे मृत्युपश्चात पहिल्या वर्षी मासिक श्राद्ध करत, तेही करतात. आपण दारावर तोरण लावतो तेही लाल कापडाचे तोरण लावतात, आपल्यासारखेच आकाशकंदील दाराबाहेर टांगायची त्यांच्याकडेही पद्धत आहे. आपल्या प्रमाणेच त्यांचेही वर्षभर मून फेस्टिवल, लॅटर्न फेस्टिवल, हंग्री घोस्ट फेस्टिवल, ऑटम फेस्टिवल, स्प्रिंग

फेस्टिवल अशांसारखे सण चालू असतात. आपण जसे होळीला पुरणपोळी, पाडव्याला श्रीखंड, संक्रांतीला गुळपोळी करतो तसे तेही वेगवेगळे केक, वेगवेगळ्या मिठाया तयार करतात. जसजसे सिंगापूरच्या वास्तव्यातले दिवस जात होते, तशा खूप गमतीच्या गोष्टी कळू लागल्या. होता होता चिनी नववर्षाचे दिवस जवळ येऊ लागले, अन मुळातच देखणी नार नवीन अलंकारांनी नटावी त्या प्रमाणे देखणे सिंगापूर नववर्षाच्या स्वागतासाठी नटायला लागले.

आपल्याला ज्याप्रमाणे दसरा झाला की दिवाळीचे, खरेदी, खाद्यपदार्थ तयार करण्याचे वेध लागतात, तसे चिनी लोकांनाही त्यांच्या वर्षाचा १२वा म्हणजे शेवटचा महिना आला की नवीन वर्षाचे वेध लागतात. १२ व्या महिन्याच्या आठव्या दिवसापासूनच काही ना काही महत्वाचे दिवस साजरे करणे चालू होते. शेवटच्या महिन्याचा ८ वा दिवस सांख्यमुनी बुद्धाच्या स्मरणार्थ तांदळाची खीर बनवून त्याचा नैवेद्य दाखवून साजरा केला जातो. त्या महिन्याच्या १६ व्या दिवशीची एक वेगळीच गंमत कळाली. सगळ्ऱ्या कंपन्यांचे मालक या दिवशी आपापल्या कर्मचाऱ्यांना एक मेजवानी देतात. त्या जेवणासाठी कर्मचाऱ्यांना काहीही कॉन्ट्रीब्युशन द्यायचे नसते. त्यांच्या बॉसकडून त्यांना ते दिले जाते. त्या दिवशी जेवणात मसाला भरून शिजवलेली संपूर्ण कोंबडी हा मुख्य पदार्थ असतो. त्य़ा कोंबडीचे डोके ज्या

कर्मचाऱ्याकडे असते त्याला नंतर नोकरीवरून काढले जाते. किंबहूना बॉसला ज्या कर्मचाऱ्याला काढून टाकायचे असते त्याच्याकडेच कोंबडीचे डोके येईल अशीच व्यवस्था बॉसकडून केली जाते. त्यामुळे जरी हे जेवण फुकटात मिळणारे असले तरी सहसा काही ना काही कारणे दाखवून कर्मचारी ते टाळत असतात. बॉसकडे जर त्या कोंबडीचे डोके आले तर मात्र सर्वच वाचतात. कारण बॉसला कोण डिसमिस करणार? ही प्रथा फॅमिलीने चालवलेल्या कंपन्यांमध्ये अजूनही पाळली जाते. मोठ्या कंपन्यांत मात्र ह्या जेवणात देण्यात येणाऱ्या कोंबडीचे फक्त धड असते, डोके कधीच टेबलावर आणले जात नाही. ही माहिती वाचून मोठीच करमणूक झाली. याच दिवशी संपूर्ण प्रदेशाचा मालक –भूपती- असणाऱ्या देवाला खूश ठेवण्यासाठी त्यालाही वाईन, केक व कोंबडीचा नैवेद्य दाखवला जातो. इतर देवांपेक्षा हा देव सर्व लोकांच्या जास्त जवळ असतो. तो खूष झाला तर तो आपली भरभराट करेल, संपत्ती देईल असा चिनी लोकांचा विश्वास आहे. रस्त्यात जागोजागी या देवाचे छोट्याश्या देव्हाऱ्यात पुतळे दिसतात.

१२व्या महिन्याच्या २४ व्या दिवसाचीही एक महत्वाची प्रथा आहे. वर्षभर काम करून ‘किचन गॉड’ (आपली अन्नपूर्णादेवी) खूप दमतो. आपण अन्नपूर्णेला कधीच सुट्टी देत नाही वा रजेवर पाठवत नाही. पण चिनी लोकांची पद्धत

वेगळी दिसली. त्यांच्या स्वयंपाकाच्या ओट्यामागच्या भिंतीवरती एका छोट्याश्या अल्तार मध्ये 'किचन गॉड'चे चित्र लावलेले असते. त्याच्यापुढे तांब्याच्या बशीत त्याच्यासाठी तांदळाचा केक, खीर, पाणी वगैरेचा नैवेद्य ठेवण्याची त्यांची प्रथा आहे. १२ व्या महिन्याच्या २४ व्या दिवशी हा 'किचन गॉड' स्वर्गातल्या मोठ्या देवाकडे जाणार असतो. या दिवशी ते 'किचन गॉड'साठी केक, भाताची खीर, तांदळापासून बनवलेली वाईन, खजूर अशा बऱ्याच गोड गोष्टींचा नैवेद्य दाखवतात. या सर्व पदार्थात खूप चिकटपणा येईल अशाप्रकारे ते बनवले जातात. हा नैवेद्य खाऊन 'किचन गॉड' स्वर्गात त्याच्या सुप्रीम देवाला भेटायला जाणार असतो. त्यामुळे त्याने बरेच गोड, चिकट पदार्थ खाल्ले तर त्याचे तोंड बंद राहील व तो मोठ्या देवाजवळ हा नैवेद्य देणाऱ्या लोकांबद्दल फक्त चांगलेच व गोडगोड बोलेल अशी चिनी लोकांची समजूत आहे. त्यामुळे 'मोठा देव' खुष होऊन येणाऱ्या वर्षात सुख, संपत्ती देईल ह्यासाठी हे सगळे प्रयत्न. (आपण तरी या पेक्षा दुसरी मागणी देवाजवळ काय करतो?) स्वर्गलोकी गेलेला हा 'किचन गॉड' नवीन वर्षाच्या आदल्या दिवसापासून पुढच्या १५ दिवसात कधीही परत येऊ शकतो. हा त्याचा स्वर्गात जाण्यायेण्याचा प्रवास बराच लांबचा व मोठा असतो. त्याला जाताना पुष्कळ खाद्यपदार्थ, वाटेत विश्रांती घेण्यासाठी अल्तार, त्याच्या रोजच्या उपयोगाच्या

वस्तूंची गरज लागणार असते. ते त्याच्यापर्यंत पोहोचवण्याचा चिनी लोकांचा मार्ग म्हणजे या सगळयाची चित्रे छापलेले कागद जाळणे. त्यामुळे त्याच्या प्रतिमेबरोबर त्याचे जुने वर्षभर वापरलेले अल्तार, हॅट, कपडे, काठी, बूट अशा गोष्टींची चित्रे छापलेले कागदही जाळले जातात. नवीन वर्षाच्या आदल्या दिवशीच्या संध्याकाळीच या 'किचन गॉडची' नवीन प्रतिमा, नवीन अल्तार आणून ते योग्य त्या ठिकाणी विराजित केले जाते. तो केव्हाही परत आला तरी नववर्षाच्या आदल्या दिवशीचा "बडा खाना" त्याच्या उपस्थितीतच बनवला जाणार असतो.

१२ व्या महिन्याच्या २५-२६ व्या दिवशीच म्हणजे किचनगॉडची पाठवणी केल्याच्या दुसऱ्या दिवशीच घराच्या स्वच्छतेला सुरूवात करतात. घराचा कानाकोपरा अगदी धुवून काढतात. मागच्या वर्षातल्या सगळया वाईट घटना, वाईट गोष्टी केरकचऱ्याबरोबर घराबाहेर फेकल्या जाव्यात या इच्छेने अगदी लक्षपूर्वक स्वच्छता करतात. घरावरची इडापिडा बाहेर जाण्यासाठी स्वच्छता करताना बांबूच्या पानांपासून बनवलेल्या केरसुणीचा उपयोग केला जातो. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळे ह्या कामात उत्साहाने भाग घेतात. २-३ दिवसात सगळी स्वच्छता पूर्ण होते व नववर्षाची तयारी सुरू होते.

तयारीला सुरूवात करायची म्हणजे खरेदी अपरिहार्यच. सिंगापूर हे मुळातच खरेदीचे मोठे ठिकाण. अप्रतिम सजावट, रोषाणाई केलेली दुकाने आपला पसारा अभिमानाने मिरवत ग्राहकांना आकर्षित करत असतात. वेगवेगळया दुकानांमध्ये वेगवेगळया वस्तूंवर सेल लागतात. १ वस्तू घेतली तर दुसरी कधीकधी तिसरीही फुकट मिळते. अगदी वेडावून जायला होतं. संपूर्ण सिंगापूर खरेदीसाठी रस्त्यावर उतरल्यासारखे वाटते. कपडे, घरगुती वस्तू, खेळणी, शोभेच्या वस्तू, फुले, फळे यांची भरपूर खरेदी केली जाते. सेलमध्ये वाचलेल्या पैशांमुळे व केलेल्या भरपूर खरेदीमुळे सगळीकडे अगदी आनंदीआनंद असतो. सिंगापूरमध्ये तसा रोजच पाऊस पडतो, त्यामुळे झाडे, पाने, फुले कायम टवटवीत असतात. नववर्ष जानेवारी–फेब्रुवारीमध्ये साजरे केले जाते. त्यांच्या दिनर्शिकेतील १२ व्या महिन्याचा शेवटचा दिवस म्हणजे अमावस्येची रात्र ही शुभ व कुटुंबातील सर्वांनी एकत्रितपणे साजरी करण्याची ‘री-युनियन इव्ह’ असते. त्यावेळी सर्वत्र फुलांचा बहर असतो. नववर्षासाठी विशेषकरून चेरिब्लॉसमच्या फांद्या घर सुशोभित करण्यासाठी वापरतात. त्याही या दिवसात मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. चौकाचौकात नववर्षा निमित्ताने डेकोरेशन केलेले असते.

जोडीला सुरेल आवाजात “गॉंग सी फा चाय” हे सर्वांना शुभेच्छा देणारे गाणे दुमदुमत असते. संपूर्ण सिंगापूर सुरेख, सुरेल, प्रसन्न अशा वातावरणाने भारल्यासारखे होते.

घराची स्वच्छता झाल्य़ावर घरच्या महिला नवीन वर्षाच्य़ा आदल्या दिवशीच्या जेवणाच्या तयारीला लागतात. त्या जेवणासाठी बाहेरगावी गेलेली माणसे मुद्दाम घरी परतत्तात. जेवणाचे खूप पदार्थ तयार करतात. हे पदार्थ तयार करताना सर्वांनी खाऊन झाल्यावर सुद्धा भरपूर प्रमाणात उरावेत, कमीत कमी नववर्षाची न्याहारी तरी आदल्या दिवशीच्या उरलेल्या पदार्थातूनच झाली पाहिजे असा गृहीणींचा कटाक्ष असतो. म्हणजे या घरात सरप्लस अन्न शिजू शकते, कुठलीही कमतरता नाही, सुबत्ता आहे, जे मिळते त्यात व्यवस्थित पुरवून त्या घरातली गृहिणी टापटिपीने घर चालवते हे देवाला कळेल व तो खूश होऊन भरपूर देईल असा समज आहे. असे भ्ररपूर पदार्थ बनवणे हे खूप कष्टाचे काम आहे, विशेषतः तांदळापासून बनवलेले गोड व थोडेसे खारट चवीचे केक बनवणे हे एक कौशल्याचे व वेळ खाणारे काम असते. २-४ दिवस अगोदरच हे केक बनवण्याचे काम सुरू असते. केक तयार होताना जे विशिष्ठ साचे वापरतात त्यामुळे त्या केकवरती नवीन वर्षाच्या भरभराटीच्या, प्रसन्न्तेच्या, सुबत्तेच्या चिन्हांच्या खुणा उमटतात. त्या केकला

'नीआन गाओ' व 'फा गाओ' असे म्हणतात. हे केक या दिवशी देवाला अर्पण करून खाल्ले तर येणाऱ्या वर्षात आपली भरभराट होईल अशी समजूत आहे. या शिवाय शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या पाहुण्यांसाठी भाजलेले चिंचोके, काजू, बदाम, बेदाणे, शेंगदाणे, भोपळ्याच्या, पाईनच्या, सूर्यफुलांच्या बिया, उकडलेल्या भुईमुगाच्या शेंगा वगैरेंनी भरलेला अष्टकोनी किंवा गोल ट्रे तयार करतात. घरातभरपूर संत्री आणून ठेवतात.







अनामिका बोरकर



शुभेच्छांबरोबरच प्रत्येकाला २-२ संत्री देण्याची पद्धत आहे. आपणही कोणाच्या घरी गेलो तर संत्री नेण्याची पद्धत आहे. कमळे, गुलाब, शेवंती अशी फुलेही नेतात. ‘अंग पाऊ’ म्हण्जे लहान व्यक्तीला भेट देण्यासाठी लाल रंगावर सोनेरी अक्षरात शुभेच्छा लिहिलेली पाकीटे व त्यात घालण्यासाठी नव्याकोऱ्या नोटाही आणून ठेवतात.





पुरूष त्यावेळी घर सजावट करण्यात मग्न असतात. घरभर लाल कागदावर लकी पोस्टर्स लावली जातात. मुख्य दरवाज्याच्या चौकटीवर शुभ अक्षरे लिहिलेले लाल रंगाचे कापड लावतात. कुटुंबाच्या भरभराटीसाठी लाल वेल्व्हेटचे सोनेरी अक्षराने शुभेच्छा लिहिलेले कागदही सगळीकडे लावतात. दरवाज्याच्या बाहेर डाव्या बाजूला नवीन आणलेले स्वर्गातील मुख्य देव 'गॉड ऑफ हेवन' चे अल्तार लावतात. व उजव्या बाजूला त्याचेच छोटे अल्तार लावतात. बऱ्याच घरांमध्ये दाराबाहेर दोन्ही बाजूंना अखंड उस लावण्याची व लाल आकाशकंदिल टांगण्याची पद्धत आहे. घराच्या मुख्य़ हॉलमध्ये आपल्या देवघरासारखे चिनी देवघर मांडतात. देवघर लाल रंगाचे, लाकडी असते. हे देवघर म्हणजे घरातली 'स्पिरिच्युअल टॅब्लेट' असते. सायप्रस किंवा पाईनच्या लाल रंगाच्या फळीवर सोनेरी अक्षरात पूर्वजांची नावे, जन्म मृत्यूच्या तारखा लिहून ही टॅब्लेट तयार

करतात. ती एका आयताकृती पाटावर उभी ठेवतात. त्या उभ्या फळीच्या पुढे कडेवर २-३ मुले असलेली व्यक्ती (संततीच्या सौख्यासाठी) , मध्यभागी यश मिळण्यासाठी पताका घेतलेली व्यक्ती व दीर्घयुष्यासाठी एका हातात काठी व दुसऱ्या हातात पीच घेतलेली प्रसन्न मुद्रेची व्यक्ती असे पोर्सेलीनचे तीन पुतळे मांडतात. याच देवघरात नैवेद्यासाठी तांदळाचा केक, तांदळाची वाईन, पाणी वगैरेही ठेवतात. त्यांच्याकडे अननस व त्याचे फूलही देवापुढे ठेवण्याची रीत आहे. जर ते देव बदलायचे असतील तर ते कसे बदलायचे, त्याची अल्तार मधली दिशा, ते कोणी बसवायचे, कुठल्या दिशेकडे तोंड करून आणायचे, याचीही एक विशिष्ट पद्धत व अनुक्रम आहे. तो ते अगदी कटाक्षाने पाळतात.

ही सर्व तयारी होईपर्यंत नववर्षाच्या आधीची संध्याकाळ होते व सर्वांची नवे कपडे, दागिने घालून नटून तयार होण्याची एकच लगबग उडते. त्या कुटुंबातील सर्वात मोठ्या व्यक्ती ज्या घरी रहात असतील त्या घरी सगळे जमतात. आज कुटुंबातील शक्य असतील तेवढेजण एकत्र जेवणासाठी जमणार असतात. मोठ्ठ्या माणसांसाठी हा अत्यंत आनंदाचा दिवस असतो. सर्वजण जमल्यावर एकमेकांना शुभेच्छा देणे, खजूर, वेगवेगळया बिया खाऊ घालणे हा कार्यक्रम सुरू होतो. मग केलेले सर्व पदार्थ टेबलावर मांडून सर्वांसाठी भरभराटीची, दीर्घायुष्याची प्रार्थना करतात. शुभ

शब्द वापरून ‘यू शेंग’ हा महत्वाचा विधी सर्वजण मिळून पार पाडतात. ‘यू शेंग’ म्हणजे एका मोठ्या थाळीत किसलेला कच्चा मासा, किसलेले गाजर, बारीक चिरलेला मुळा, कोबी वगैरे भाज्या, दाण्याचे अर्धवट कुटलेले कूट, मिरी पावडर, मसाले, पामचे तुकडे, तेल वगैरे एकत्र करून तोंडाने शुभेच्छा उच्चारत चॉपस्टिक्सने हवेत टॉस करणे. जितके उंच टॉस करता येईल तेवढी जास्त भरभराट नवीन वर्षात होणार. जेवणाच्यावेळी इतर पदार्थांबरोबरच नववर्षाचा ‘नीआन गाओ’ म्हणजे नवीन वर्षासाठी केलेला केक व ‘फा गाओ’ हा प्रॉस्पेरीटीसाठी केलेला केक खाऊन सर्वजण मेजवानीचा आस्वाद घेतात. त्या रात्री १२ वाजून गेल्यावर परत एकमेकांना शुभेच्छा दिल्याखेरीज कोणीही झोपायला जात नाही. घराबाहेर लहानांबरोबर मोठ्यांनी केलेली आतिषबाजीही अगदी बघण्याजोगी असते. भरपूर शोभेची दारू उडवतात, मोठमोठ्या मेणबत्त्या पेटवतात, उदबत्त्या जाळतात. अगदी लहान मुलांनाही रात्री १२ वाजेपर्यंत जागे ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. असे जागे रहाण्याने आयुर्मर्यादा वाढते असे समजतात. रात्री १२ नंतर नववर्ष चालू होते. लहानांपासून सुरूवात करून नात्याच्या व वयाच्या चढत्या क्रमाने जमलेले सगळे क्रमाक्रमाने घरातील वयस्कर व्यक्तींच्या पुढे गुडघ्यावर बसून त्यांना खजूर किंवा सूप वा चहा देतात. मोठी माणसे त्या बदल्यात लहानांना ‘अंग पाऊ’ची पैसे


घातलेली पाकिटे देतात. कोणी वेगवेगळय़ा देवळात जाऊन देवापुढे उदबत्त्या लाऊन त्याचे आशीर्वाद मागतात. अपशब्द बोलायचे टाळणे, दुसऱ्यांना कात्री सुरी या सारख्या धारदार वस्तू भेट देणे टाळणे अशा बऱ्याच गोष्टी आवर्जून पाळल्या जातात. नवीन वर्षाच्या महत्वाच्या या दिवसात केस कापणे अशुभ मानतात. री-युनियनच्या जेवणासाठी लग्न झालेल्या मुली आपापल्या सासरच्या घरी जातात. दुसऱ्या दिवशी मुली त्यांच्या नवऱ्यामुलांसह आईवडिलांना भेटायला जातात. नववर्षाच्या पुढचे पंधरा दिवस तरी हा भेटीगाठींचा व शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम चालतो. १५ व्या रात्री सर्वत्र वेगवेगळ्या आकाराचे रंगीबेरंगी आकाशकंदील टांगून नववर्षाच्या स्वागत समारंभाची सांगता होते. २१, २२, २३व्या दिवशी हाक्का, हॉकीयन्स, कॅंटोनीज, ताओ व हायनीज ह्या पंथांचे वेगवेगळे देव शहरात फेरफटका करायला निघतात. या मिरवणूकीत वेगवेगळे ग्रुप नाच करत आपापली कला दाखवतात. या मिरवणूकीला ‘चिंगे प्रोसेशन’ म्हणतात. सिंगापूरमध्ये आता ही मिरवणूक ऑर्चर्ड रोडवर सादर केली जाते. वेगवेगळ्या देशाचे लोकही आपापल्या देशातील वैशिष्ठ्यपूर्ण कला या मिरवणूकीत सादर करतात. मी कधीच ही मिरवणूक पहाण्याची संधी चुकवली नाही.





या नववर्ष साजरे करण्याच्या पद्धतीमध्ये आता काळाप्रमाणे व प्रदेशाप्रमाणे बदल झाले आहेत. तरीही त्यातला, आनंद, अपेक्षा, उत्साह यात जरासाही फरक पडलेला नाही. सिंगापूरच्या १८ वर्षांच्या वास्तव्यात या नववर्षाच्या स्वागतात जास्तीत जास्त भाग घेण्याचा आमचा प्रयत्न असायचा. सिंगापूरच्या चायना टाऊन या भागात या दिवसात खाद्यपदार्थांचा, चिनी वस्तूंचा, चिनी शुभचिन्हांचा बाजार फुललेला असतो. चेरिब्लॉसमच्या कळया असणाऱ्या काड्या, कमळे, शेवंती सारखी फुले बाजारात आपली वाट पहात असतात. जागोजागी बुद्धाची वेगवेगळी रूपे, ज्या प्राण्याचे वर्ष असेल त्याचे पुतळे, प्रतिकृती, कागदावरची चित्रे विक्रीसाठी तयार असतात. रस्त्यात, चौकात, मोकळ्या जागेत, दुकानात या प्राण्यांना महत्वाचे स्थान मिळते. वेगवेगळया ठिकाणी चिनी ऑपेरा सादर होत असतात. आपल्याला भाषा अजिबात कळत नसली तरी ऑपेराचा आनंद आपण मनापासून घेऊ शकतो इतका हा

ऑपेरा सादर करणाऱ्या कलाकारांचा अभिनय समर्थ असतो. लायन डान्स व ड्रॅगन डान्स सादर होताना पहाणे हा एक रोमहर्षक अनुभव आहे. माणसांनी व वस्तूंनी गजबजलेल्या चायना टाऊनमध्ये नववर्षाच्या रात्री फिरण्याची मजा काही औरच. अगदी पुण्यातल्या गणपतींच्या दिवसांची आठवण येते. सरकारी, निमसरकारी, खाजगी व्यापार उद्योगांना २ दिवस सुट्टी असतेच पण मोठमोठ्या शॉपींग मॉल्सलाही या सणाची २ दिवस सुट्टी असते. या सुट्टीच्या दिवसात चिनी लोकांचा आवडता खेळ ‘माजॉंग’ घराघरात रंगतो. विशेषतः ज्येष्ठ मंडळी या खेळात विशेष रस घेतात. या खेळात लोकांना रात्ररात्र तल्लीन झालेले पहाण्यातसुद्धा खूप आनंद असतो. सिंगापूरमध्ये वर्षभर अनेक सण साजरे केले जातात. पण हा नववर्षाचा सण सर्व सणांचा राजा वाटतो. तो सण नयनरम्य तर आहेच पण जोडीला तो ‘गॉंग सी फा चाय’ च्या सुरेल धूनमुळे सुरेलही आहे. चिनी नववर्षाची शोभा चीनमध्ये या पेक्षा नक्कीच जास्त असेल पण सिंगापूर हे तसे अगदी छोटे व सगळीकडे फिरायला सोपे असल्याने सगळीकडची रोषणाई, सजावट पहाता येते व मजा अनुभवता येते. संपूर्ण शहर नव्हे तर संपूर्ण देश नटलेला पहायचा असेल तर चिनी नववर्षाच्या सणाच्या दिवसात नक्की सिंगापूरला जावं!




अनामिका बोरकर यांची यापुर्वीची दोन पुस्तके
कव्हरवर क्लिक करताच उघडतील.



# दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

## सुंदर हा देश

### त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण…

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल

वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. ज्या वाटेवर फिरण्यात तुम्हाला आनंद वाटतो तो वाटेचा आनंद वाटेल तेव्हा वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com